जावक क्र. संगणक/ 3329 /२०२६.

जिल्हा न्यायालय, सातारा

दिनांक : २३/०४/२०२६.

संदर्भ – मा. केंद्रीय प्रकल्प समन्वयक (Central Project Co-ordinator)
उच्च न्यायालय, मुंबई यांचा ई-मेल दि. २०/०४/२०२६.

जाहिर सूचना

मा. केंद्रीय प्रकल्प समन्वयक (Central Project Co-ordinator) उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भांकित ई-मेल अन्वये सर्व विधीज्ञ व पक्षकार यांना सूचित करण्यात येते की, भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या ई-समितीद्वारे (e-Committee, Supreme Court of India) 'ई-कोर्ट सेवा मोबाईल ॲप' (eCourts Sevices Mobile App) ची नवीन आणि सुधारित आवृत्ती ४.० लॉच करण्यात आली आहे. या नवीन आवृत्तीमध्ये अधिक प्रगत वैशिष्टये आणि सुधारणा करण्यात आल्या आहेत.

ही नवीन आवृत्ती ५ मे २०२६ पासून कार्यान्वीत (Live) होणार आहे. या बदलाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी आणि तुमचा डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी eCourts Services Mobile App अपडेट करण्यापूर्वी सध्याच्या ॲपमधील बॅकअप (Backup) घेणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे डेटा गमावण्याचा (data loss) धोका राहणार नाही.

तरी सर्व विधिज्ञ व पक्षकार यांनी सध्याच्या eCourts Services Mobile App मधील बॅकअप (Backup) घेण्यात यावा.

सबब माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.

दिनांक – २३/०४/२०२६.

सातारा.

23.04.26

(ए. एस. वाघमारे)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा.
(MHST01-02446)

प्रत - माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी -

१. सर्व जिल्हा व तालुका न्यायालये, न्यायीक जिल्हा सातारा.

२.जिल्हा न्यायालय, सातारा / दिवाणी न्यायालय व. स्तर. सातारा /मुख्य न्यायदंडाधिकारी, सातारा /जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,सातारा/कौटुंबिक न्यायालय, सातारा तसेच सर्व जिल्हा व तालुका न्यायालये यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी तसेच सर्व जिल्हा व तालुका न्यायालयातील ई-सेवा केंद्रा मध्ये व जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

३. अध्यक्ष, सातारा जिल्हा बार असोसिएशन, सातारा.